म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७८९



REFBK-0020108
REFBK-0020108

वि. रा. तोडकर

शंकर्ष
२०१०८ काव्य
२७११११७४. २१८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २०१०८ वि: काव्य
क्रमांक २१८९ नों: दि: २७।११

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. २०१०८
संग्र: शाखा (स्थळ प्रत)

# ग स्त

( कवितासंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम २०१०८ वि: [illegible]
क्रमांक २१८९ नों: दि: [illegible]

प्रा. वि. रा. तोडकर,
इस्लामपूर.

REFBK-0020108
REFBK-0020108

किंमत ५ रुपये

श्री लेखन वाचन भांडार,
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे ३०.

प्रकाशक : श्री. ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
श्री लेखन वाचन भांडार
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे ३०.

© प्रा. वि. रा. तोडकर

किंमत : रुपये पाच

पहिली आवृत्ती : १९७३

मुद्रक : श्री. अनिल भालचंद्र आठले
प्रभाकर प्रिंटिंग प्रेस,
इस्लामपूर, जिल्हा सांगली.

## सादर अर्पण

*मा. प्रा. भगवंत देशमुख*, एम्. ए.
व
*सौ. कुसुमावती देशमुख*

**औरंगाबाद**

**यांना :—**

यांच्या नजरेची 'गस्त' जर मजभवती नसती तर ही 'गस्त' रसिकांपर्यंत पोहोचणे शक्यच नव्हते.

**प्रा. वि. रा. तोडकर**

## अनुक्रम


| | पृष्ठ क्र. |
|---|---|
| ५३ ) एकदा | ४७ |
| ५४ ) हाक | ४७ |
| ५५ ) एक कविता | ४८ |
| ५६ ) भुलावण | ४९ |
| ५७ ) नाटक | ५० |
| ५८ ) घर | ५२ |
| ५९ ) भिंती | ५४ |
| ६० ) उमज | ५६ |
| ६१ ) शंख | ५८ |
| ६२ ) एक कविता | ६० |
| ६३ ) कल्पकतेने | ६२ |
| ६४ ) संजीवन | ६४ |
| ६५ ) परदुःख शीतल | ६५ |
| ६६ ) 'ॐ' कार | ६६ |
| ६७ ) प्रतीक्षा | ६७ |
| ६८ ) वेदना | ६८ |
| ६९ ) हवाचंद | ६९ |
| ७० ) बिंग | ७० |
| ७१ ) मन | ७१ |
| ७२ ) जार | ७२ |
| ७३ ) फाया | ७३ |
| ७४ ) खपली | ७४ |
| ७५ ) निर्मिती | ७५ |
| ७६ ) शिका | ७६ |
| ७७ ) अद्वैत | ७७ |
| ७८ ) गस्त | ७८ |

# शुद्धिपत्रक

| पृष्ठ क्रमांक | ओळ क्रमांक | असे आहे | असे हवे |
|---|---|---|---|
| ११ | ९ | कागेत्याही | कोणत्याही |
| ३७ | १ व २ | बेफान | बेभान |
| ४४ | ५ | अपत्यसंथत्र | अपत्यसंभव |
| ५६ | ६ | होते या | होते. |
| ५७ | १ | कान | कात |

याशिवाय काही ठिकाणी अनावधानाने ' म्ह ' च्या ऐवजी ' ह्य ' असे झाले आहे.

## तुझ्यामुळे—

किती दिवस ........! जुळवीत होतो अक्षर अक्षर
पण गीत काही जमलेच नाही!
शेकडो घरांतून धुराचे ढग निघाले ह्मणून
मोराला कंठ फुटत नाही!
एकदा, तू आलीस, उधळीत यौवनगंध
म्हणालीस– "गा की रे जरा........!"
पोटात कसे गलबलून, गलबलून गेले,
वाहत राहिला गीतांचा झरा.........!

## लक्षात असू दे..........!

असेही असेल प्राक्तनात
माझ्या उसाशांच्या वादळात मी बुडून जावे
तू दुजाच्या दिठीत स्वतःला मिटून घ्यावे
योग असतोच भोग भोगण्याचा प्रत्येकाच्या भाळी
कर्तृत्वाला कर्म गिळून टाकते, रात येते कधी कधी
उजाडायच्याच वेळी
कधी मागू नये ते दान मागितले, नादान ठरलो
क्षमेच्या शीतल चांदण्यातही जळतच राहिलो
रात्र कुरतडते कुडीला, डोळ्यांच्या वाती विझू आल्या
क्षमेलाही उःशाप असेल प्राक्तनात म्हणून अजून जळत
राहिल्या
या जन्मात नसू दे, कदाचित सात जन्मात नसू दे—
जग बुडल्यावरही माझे डोळे तुलाच मिटवावे लागतील—
एवढे तरी लक्षात असू दे !

## माझी नीज

सांग सखे या शद्बांची मी किती करावी कीव
हृदय ओतता तयात त्यांना भरते हीव
नयनामधली नीज नटली कोठे माझी
हे वदण्याला शद्ब न गे हे मुळीच राजी
निकट येउनी हृदयाला तू पुसशील हे तर
" नीज जाहली वश्र तुझे " हे मिळेल उत्तर !

## कलंकीत

चोर पाऊली, निशा पातली, खट्याळ चंद्रम मनी हसे
घळवून अपुले उत्तरीय तो, अत्तर शिंपीत नभी विलसे
तटस्थ होत्या साऱ्या तारा, नजरा तुजवर खिळलेल्या
कलिकेसम तू विसावलेली, वेलीवर डोळे मिटल्या
बालनेत्रीच्या निरांजनासम हास्य मुखावर तव विलसे
कलंकीत मी माझ्या नेत्री पापाचा गे साप वसे
लक्ष जिभांनी, कुरवाळोनी, सर्प तुला तो पाही डसू
परंतु परते तुझ्या मुखीचे पाहुनिया गे मुग्ध हसू
उषःकालच्या गलोलीतला खडा लागला रात्रीला
तडा जातसे, निशा सरतसे, अरुण उगवला पूर्वेला
कलंकीत मी अजून वाटे, झाले माझे व्यर्थ जिणे
तुला भोगुनी, कलंक मिरवीत, आवडले असते जगणे.

# मी

मी अमावस्येचे फळ....... .........
अंधाराच्या अजगराचा ग्रास... .......
रठरठणाऱ्या डांबराचा सुवास ..........
गर्भाशय ते स्मशानापर्यन्तचा प्रवास!
गांधारीच्या डोळ्यांना आयुष्यभर साथ दिली मी
कुंतीचे सौभाग्यही ' कुमार ' राखले मी
गीतेचा एकमेव आधार मी!
मी अनिश्चयच साकार
हिरोशिमात फुलारलेला एकमेव विकार
रेताच्या स्वीकारातील धिःकार
अश्वत्थाम्याच्या हुंदक्यातील ' ॐ ' कार
मी द्रौपदीच्या डोळ्यांतील, धर्माचा धिक्कार
लाळेच्या लाटांचा स्वाहाकार
शेषाच्या शीर्षावरील आधार
निःशेषाकडे चाललेला मीही एक निराधार

## गाणे

झाडाच्या खोडावर हात ठेवलास तरी
फुटतील त्याला अभिलाषेची चार दोन पाने !
मी एकदा तुला भविष्य सांगितले होते
तेव्हापासून तरळतेय माझ्या डोळ्यात एक गाणे !
तुझ्या हस्तरेषांचेच बरोबर होते
पण मीच सांगितले काही अधिक उणे
विचारू नकोस आता कोणते आहे ते डोळ्यात गाणे
या धरतीवर ग्रीष्मच अवतरेल त्यातील एखाद्याच थेंबाने !

## झिम्म पोरी झिम्म

झिम्म पोरी झिम्म..........
कापसाच्या बोंडलीचे फुटलेय बिंग
फुटलेल्या बिंगाचा हसू रुसू कावा
रावा करील त्याचा कानात फावा !
झिम्म पोरी झिम्म .... ....
चिंचेच्या अंगाला मोहर चिंब
चिंब चिंब मोहराचा आंबट कावा
रावा करील त्याचा ओठात मेवा !
झिम्म पोरी झिम्म..........
श्रावणाच्या सरीला अवखळ झिंग
अवखळ झिंगेचा चिप्पसर कावा
रावा सदा त्यात निथळत राहावा !

तू बसलेली,
डोळे निळसर,
त्यात नांदते
प्रौढ थं...ड...प....ण !
त्याच्याही पण
पाठी झुलते
पुन्हा यायचे
मला निमंत्रण !

साऱ्याच वाटा अखेर तुझ्या डोळ्यांच्या डोहात बुडतात
मी तुझ्या पापण्यांच्या किनाऱ्यावर विसावतो
आपुलकीच्या असंख्य लाटा उचंबळतात तेव्हा त्यात
हलवू नकोस हं पापणी, मीसुद्धा त्या डोहात बुडून जाईन !

## माझे जीवन

प्रश्नच झालेला दुर्योधन ... वासनेची मांडी उघडी टाकून
विकृती : अंध गांधारी : अंधपणा मिरविणारी !
वंचनेचा अधोमुख धर्म, निष्ठेचा अबल झालेला बलभीम
देहाच्या कवच्यात विकारलेला कर्ण, लाचारीचा झुकला भीष्म
अपराधी क्षणांच्या दरबारात तुझे वस्त्राहरण
प्रश्नाच्या दुर्योधनाने केलेले...
अधर्माच्या भयाने डवरलेला धर्म ...भाळावर प्रश्नाच्या
तू नेसलेली निर्भय, अल्वार पापण्यांच्या उघडझापींची
प्रावर्णे
वस्त्रहरण तुझे कधी झाले? नियतीनेच कुरतडली ही
जीवनपाने
अन् धृतराष्ट्र-गांधारीच्या डोळ्यांतील तमच झालेले माझे
जीणे

## वठलेले झाड

अजून वाटा गातात, तुझ्या नूपुरांचे सांडलेले गाणे
तृणपाती सज्ज तुझ्या स्वागतास पेलीत दवांचे नजराणे
आभाळ झुकून खाली आलेले, अभिलाषेची निळाई
डोळ्यात रेखलेले
मेघात किनारलेले सरींचे गाणे, वीजेच्या पानांचे लवलवणे
तुझ्या कुंतलाशी लाघटपणा करणाऱ्या वेली
चराचरच असे उत्सुक तुझ्याशी करण्याला केली !
खुडून टाक ती ओठावरची मौनाची अबोली
गुणगुणत रहा कोणत्याही कसल्याही गीतांच्या ओळी !
वळणावरती थबकू नकोस, ओठावरचे गीत विसरू नकोस
" एवढे एकच झाड वठले कसे ? " कोणालाही विचारू नकोस

## आली नाहीस तर

तुझ्यामाझ्यासाठी नेहमीच तो
किरणांची पाऊलवाट तयार ठेवतो
तुझ्यासाठी सागर लाटांची पैंजणे
नवरंगाच्या हिऱ्यांनी सजवीत राहतो
......दूर...... माडांचे जावळ कुरवाळीत
घनावलीला सजवीत राहतो
कामदंग भृंगांना पाहून
विव्हल कमलिनींचे नेत्र मिटवितो
........आता मात्र आली नाहीस तर......
शून्य किनाऱ्यावर फुटणाऱ्या—
लाटांचा आक्रोश ऐकविणार नाही तुला !
एकटीला...... !

## पुरुष

विसावले शिर खांद्यावरती
कटी वेढलीस एक कराने
निळ्या नभातून चालत होतो
स्नेहलतेच्या आधाराने !
त्या स्पर्शाने तोलच सुटला
निकट ओढुनी कथिला हेतू
" राहशील का अशीच जवळी ?
मला हवी तू !......मला हवी तू.... ! "
खदखदुनी हसलीस केवढी
वीज गोवलीस शद्बांमध्ये
" पुरुष तुम्ही सारखेच सारे
डुंबत राहता पापामध्ये ! "
तेव्हापासून फिरतो आहे
भळभळती ही जखम जपत मी
पायाखाली अभंग धरती
तरीही फिरतो निराधार मी !

आकाश केवढे मोठे आहे
पण डोळ्यात सामावते !
तुझी इवलीशी आठवणही
अश्रूंबरोबर वाहत राहते !

## मानवले !

जाण आली पण....
जाणतेपणाच आला नाही
एवढेच जाणवले
ओठ पोळले पण....
तेही ताकानेच
तेवढेही मानवले !

## एकच वाट

एक अनावर घाट
निथळती वाट.... !
सागर लाटांत
बुडाली पिसाट
भरकटले तारू
कसे ग आवरू ?
बुडूनच तरणे
एकच वाट !

## कळ

उधाणल्या रेषा
जाग्रणे फळाली
अणुरेणूतून
कळ झणाणली.

## मर्दुमकी

मौनाची कात टाकून
मनाची मर्दुमकी
तू....धर्मप्रसवा...
जीवा...! जीवा...!

## काजळ

ती आकारेल
मग थरारेल
मग उसासेल....
तेव्हा मात्र तिच्या डोळ्यात
माझ्या आठवणींचे काजळ असेल !

## शिक्षा

सारीच मिटलेली दारे....
अंधाराच्या न्यायालयात माझी उलट तपासणी !
तावदानावर थरारणारा
बोगणवेलीचा हात पाहत राहण्याची शिक्षा जीवघेणी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम २०१०८ दि:
क्रमांक ५८०५
२१८ २४७११
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. २०१०८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## साक्षीदार !

डोक्यावरील अफाट आभाळाएवढी माझी आकांक्षा !
या धरतीवरील कोणीतरी एक ' बाई ' माझी असेल
शुभमंगलाच्या घोषात सामोपचाराच्या गाठी माराव्या
लागतील
पुरुषार्थासाठी काही रात्री जागवाव्या लागतील
तिलाही त्या स्त्रीधर्मासाठी सजवाव्या लागतील
एकाक्षणाची पत्नी अनंतकाळची माता होईल
तू दिलेल्या वंचनेने फक्त एवढेच होईल
या साऱ्याला माझे प्रेत साक्षी राहील.

## प्रश्न आणि उत्तर

"असा कसा तू मित्रा, बुजरा
जखम मनाची जपत राहशी ?"
तुझा प्रश्न हा ........
मला न ठाऊक त्याचे उत्तर !
"वळणावरती निरोप घेता
शब्द तुझे का होती कातर ?"
या माझ्या प्रश्नातच तुजला
मिळेल तव प्रश्नाचे उत्तर !

# हे हात !

हे हात! मूकच राहिली ज्यांची भूक
मिठी मारून परस्परा समजावीत गेले त्यांचीच चूक
" कुठल्या अशुभ वेळी सुचले आपणांला ?
सोबत मागितली तिच्या कर्तव्यतत्पर करांची!
आकांत नाही, आक्रोश नाही, थोडासा रोषही नाही!"
ह्मणाली, " तुमच्याच कर्तृत्वात भागीदार होणे आवडेल
यांना
तुमचीच आहे सोबत यांना, आजची, जन्मोजन्मींची!
पण नकाच सांगू एकमेकांना नाळीगोती
त्यांनीच तर केली जीवनाचीच साऱ्या माती!"
त्या पवित्र स्पर्शाने करपून गेले हे हात
झंझावातातील माडासारखे आता तडफडतात
चिडतात.......एकमेकांच्या मिठीत घुसवूनघुसवून
रडतात
पुन्हा पुन्हा जुळतात, अखेरच्या निरोपासाठी व्याकुळ
होतात.

## भुकेजला

क्षितिजापर्यंत धावणाऱ्या दूरध्वनीच्या तारा
बाभळीचा बहकलेला हिरवाजर्द पिसारा
हिरवाळीत पिसाटलेला सुगंध-गर्द वारा
तुझ्या डोळ्यांत तडकलेला विरहसर्द पारा !
वेळू वनातील फुसलावी हुलकावणीची शीळ
लबाड, घुसमुसळा, चावरा बावरा अनील
तुझे रुपडे लाटांनी ओरखडणारे हावऱ्या झऱ्याचे सलील
अन् गालावर तुझ्या भुकेजला ओला दर्द तीळ

## हे वयच !

अटळ असते ही योगायोगांची कुंडली
नाहीतर तुझ्या लग्नापूर्वीच नसती का गाठ अपुली पडली ?
कितीदा पाहिले मी तुला ' हो-नाही ' च्या हिंदोळ्यावर
आंदोलताना
काही जोडून काही तोडून गेली होतीस, माझ्या बाहू-
पाशातून सुटून जाताना !
खोटेच बळ होते ते, काहीसे भीतीचे, जनलज्जेच्या रीतीचे !
दूर ढकलतानाही ऊर कथून गेलेले, नूर प्रीतीचे,
अनोख्या रीतीचे !
तुझे पहिलेच आमंत्रण असे, जवळ असून दूरात जळण्याचे !
कशाला सांगतेस मला, हे वयच असते कळूनही न
कळण्याचे !

## मगरमिठी

तुझ्या कंकणांचे कंपणस्वर वेचणारे
माझ्या बोटांचे पक्षी
अन् तृषार्त विलगलेले ओठ
विसावलेले तुझ्या वक्षी
संकोचल्या मांड्यांनी तुझ्या
एकमेकींनाच घातलेली मिठी
त्यांच्यावरच थरारणारी
माझ्या दिठीची मगरमिठी.

## बळ

पार्थिवातील उध्वस्त देहमंदिर
आत्मा कधीच हरवलेला उरलेले मातीचे शरीर
पार्थिवात त्यालाही मूल्य असते
संस्कृतीच्या मयसभेत देहाचेच तर काम असते.
देह वापरता येतो धर्मासाठी, कर्मासाठी
कधी दुसऱ्याचा तर कधी आपलाही विकता येतो पोटासाठी।
म्हणूनच संस्कृती संरक्षकांनी तुला विकले एका देहाला
तूही गेलीस, मुकाटपणे? वळून भिजलेल्या नेत्रांनी
पाहिलेस मला!
तेवढेच मला पुरते आहे, बळ येत असते हातांना
उध्वस्त देहमंदिराची या वीट वीट जपताना!

# रीत

मी एकटाच गात असतो, एक एकाकी गाणे
ज्यात शद्बच नाहीत मुळी, राहिलेले रिकामेच सारे रकाने !
काना-मात्रा-वेलांट्यांची मैफल व्यर्थच वाटते मुळी
शद्बांच्या या भ्रमात कसा सापडणार मी तुला, जिवंतपणीच
गेलेला सुळी !
वेळीच जर असतेस आवरले प्रणयाचे पाखरू
तर एवढे भरकटलेच नसते हे एकाकी तारू
वारू उधळलेला विषयाचा, संयमाचा लगाम तुटून गेलेला
माझे हात रिकामेच ठेवून तू मात्र दुसऱ्याचा हात
हाती घेतलेला
वर म्हणालीस हासत, "फाडून टाक ती जुनी जीवनपाने
घे करात कर दुसरीचा आणि मांड संसार पुन्हा
नवेपणाने"
युक्ती मलाही कळते, पण सक्तीच बरी जळत जळत
जगण्याची
रीत तुलाच लखलाभ असो प्रीत दोघांशी करण्याची.

## भैरवी

रातराणीची सुगंध भैरवी आटोपत आलेली
स्वप्नतंद्रिस्त पानांची झोप थोडीशी चाळविली
फडफडले पंख पानांत पक्षांचे
लतांना गुदगुदल्या करीत फिरते पोर वायूचे।
कळ्या हसू लागलेल्या एकमेकींना कुरवाळीत
अस्पष्ट होऊ लागलेली चंद्राची नाव, जलवलयांच्या जाळीत
प्राजक्ताचे अंग अंग अश्रूंच्या फुलांनी डवरून आलेले
अनामिकाच्या जखमेतील रक्तच त्याच्या देठादेठांत थिजलेले।
धुक्याने दाटून आलेली अशी एक पहाट
तडतडणाऱ्या चितेला सोबत खिन्न उदास घाट।

## आपण हमाल!

हँगरला अडकविलेला सफेद शर्ट
म्हणजे मी! (असे जग समजते.)
शिवाय धोतर.... (तें कमरेलाच हवे!)
किती सोप्या असतात.......
'माणूस' म्हणून जगण्याच्या अटी
(पहाना धोतराच्या कधीही सोडता येतात गाठी)
जन्माला आलो तें 'वन् वे ट्रॅफिक' ने
जातानाही तसेच जावे म्हणतो
पण त्याचा काही भरवसा नाही हल्ली
कारण जिवंत असलेलीच प्रेते भेटतात गल्लोगल्ली!
प्रेतांच्याच सोबतीने गात्रांची वाटचाल
नरमादीच्या मीलनाला पालीच्या गळ्याचा ताल
असाच एक ताल...तसाच एक ताल!
आपल्याच जिण्याचे आपण फक्त हमाल!

## कैलास

जख्मी काहूरतलगांचा थवा
मनाचे शिणले शुश्रूषागृह
विवेकाचे थकून गेलेले हात
सारेच सावरण्याचा वर तुझ्या होकारात
पण नकोच आता....
माझ्या स्वीकारात तुला मिळेल कदाचित
जख्मी काहूरतलगांचा थवा
मनाचे शिणले शुश्रूषागृह
विवेकाचे थकून गेलेले हात...
माझ्या कैलासात मला एकट्यालाच राहू दे!

## “ हात पुढे कर.... ”

तुझ्यान् माझ्यामध्ये तेव्हा
नव्हते हाताचेही अंतर
म्हटले असते सहज जरी मीं
(अथवा तू जर... )
“ हात पुढे कर.... ! ”
तेवढेच पण शद्ब जपून तू–
खूप बोललीस !
मीही केवळ मुकेपणाने खूप ऐकले !
जेव्हा होते मन आक्रंदत–
“ हात पुढे कर ....हात पुढे कर ! ”

## तुझे कशाला

मंद वाहतो, गंध भेटीचा, नशा मनाला चढलेली
जाता जाता चंद्रकोरही पाऊल रुतवून खिळलेली
झिळमिळ सागरलाटा अर्पिती, फेन फुलांचे तुला तुरे
निकट आल्यावर तुझे कशाला "गडे पुरे ना! गडे पुरे!"
काळोखाचे कोरीत अतर दिपस्तंभ एकटा जळे
गीत विदीर्णात्म्याचे सखये लाटांच्या ओठी उसळे
पराजयाला नसते सीमा प्रीतीच्या राज्यात सखे
विरहाच्या वडवाग्नी जळणे भाळीचे त्याच्या न चुके
तटतटते ज्या क्षणात अमृत, लसलसूनी खुडणे येथे
स्तिमित होऊनी, स्मित पेरुनी, मौनातून फुलणे येथे
प्रलयातूनही सखे अशा या मदिर क्षणांचे गीत उरे
निकट आल्यावर तुझे कशाला, "गडे पुरे ना गडे पुरे!"

## तू असल्यावर...तू नसल्यावर !

तुझ्या स्मृतींनी किती फुलविली....
गीते....गीते... ! नसता नाते !
तू दिसता पण एक हुंदका–
सनाथ होतो....जोडीत नाते !

## चक्र

विस्मरणाच्या स्खलनशील वाटेवरून जात असताना...
स्मरणाचे स्नेहशील दीप तेवतात, वाट दाखवितात
दूर दूर निराशेच्या तमात बुडत गेलो तरी—
जेथून निघालो तिथेच माझे चरण असतात.

"ए .... ! डोळ्यात जरा फुंकर मारतेस का ग?"
"तेव्हा तुझ्या डोळ्यांनी दिलेले दान, मला सात जन्म
पुरणारे आहे!"

## दाता आणि याचक

बेफान, अनावृत्त घनात आकारलेले तुझे स्तन
मिटता मिटता सवित्याने दिलेले किरणांच्या कंचुकीचे दान !
या दानाचेही दान करणारी तू एक बेफान अजान
माझे डोळे नेहमीचेच याचक, जोपर्यंत देहात प्राण !

## सवती मत्सर

आणि तुझे गळ्यातील हात
गळून गेले तेव्हा
आकाश थरारले होते
माती भणभणली होती
अनोळख्या सृजनाची नवखी चाहूल
तिचा सवती मत्सर जागी करणारी होती.

## साळसूद

हरबऱ्याचे पोर जेव्हा
निळ्या जांभळ्या फुलांचा मॉनिला घालते
अन् वाऱ्याबरोबर उंडारत राहते
तेव्हा दोडकीची वेल उगाचच कावरीबावरी होऊन
काळ्याशार बांधावरून भिरभिरते
भेंडीला फुटतात मत्सराचे काटे
अन् करडई कशी साळसूदपणे उभी राहते
पण जेव्हा आरक्त केशरी रंग तिच्या गालावर खुलतात
तेव्हा तिच्या लक्षात येते, जे पोटात असते
ते असे ओठावर येते!

## एक दुपार.......

एक दुपार...
गळ्यात तहान रुतलेली.......
दूरदूरच्या निळाईत तिथे
मृगजळ-सरिता अवतरली
झिम्मा झिम्म वारा चिंब
वणव्यात वाळू भिजलेली
शून्यात सृष्टी शिजलेली
गळ्यात तहान रुतलेली
एक दुपार
गळ्यात तहान
मृगजळच चाटते पानन् पान !

## भित्री राणी

किती वर्षे मनाला समजावीत आले
" नीट नाकासमोर चालत रहा "
तूच येऊन कुस्करलेस नाक...एकदाच !
(तेही....स्वप्नात... !)
तेव्हापासून बिथरलेच हे मन
चालू लागले तुझा हात, घेऊन हातात
(मनातल्या मनात... !)

## मातीचे मडके

पोकळीच्या पिंजऱ्यात
शून्याचा पोपट
आळसाच्या ढेकरीला
अध्यात्माचे सालपट
पोपट बोलतो गोड गोड...
आकाशाला फुटले ढगांचे कोड
आळसाला फुटले मोड मोड
मातीचे मडके फोड फोड....

## मृगधार

माझ्या थरथरणाऱ्या पापण्यांच्या पंखाचे
लाजपांगुळे पाखरू
मी कसेबसे पोहचविले
त्याच्या नजरेच्या डहाळीपर्यंत
हाय राम!
तो तर डोळे मिटून बसलेला....
खुळा कुठला!

## सीमारेषा

माझे सीमातीत गीत
सीमित होते
तुझ्या यौवनाच्या सीमारेषात
तुझ्या यौवनाला
सीमाच नसतात
माझ्या गीतात!

## अगस्ती

दूर क्षितिजाच्या उरात तरारून रहा गुल्मोहर होऊन
लहर लहर लहरू दे माझी अभिलाषाच सागरलाटा होऊन
रागाचे विष पोटातच राहिलेय, एकदाच घे अनुरागाचे
अमृत ओठावरचे पिवून
एकदाच प्राजक्ताचे हासू हास, मग खुशाल आचमन—
करू दे तुझ्या नकाराचा अगस्ती येऊन

## सोहळा

लसलसत्या उन्हाने राईच्या गळ्यात घातलेला गळा
तृप्तीनं निथळणाऱ्या राईच्या डोळ्यातून ओसंडणारा
भाव भोळा
ऋतुचक्राच्या पंखावरून मी खूपखूप मागे गेलो
तेव्हा तुझे वय सोळा !
आता पाचोळ्यातून फरफटणाऱ्या उन्हाला पुरतो आहे हा
आठवणींचा सोहळा !

## नाते

नाते मातीचे नपुंसक अपत्य
कोणाच्याही जन्माबरोबर लाघवीपणाने त्याला हे चिकटते ;
ते कधी संस्कृतीच्या बुरख्यातून तर कधी इतिहासाच्या
कधी रक्ताच्या तर कधी भक्ताच्या !
पण नपुंसकाला अपत्यसंभव नसतो—
केवळ भोग असतो
नाते: केवळ भोगाचे ऋतुचक्र !

## वास्तव

दहिवर म्हणजे गवताचा गाहिवर !
गवताचे दु:ख असे गवताबरोबर उमलते
सुज्ञांचे जग त्या क्षणजीवी थेंबाना मोती म्हणते
वास्तवाचे असे अवास्तवाशी नाते असते.

## प्रकाशकण

काळेच आकाश, काळीच धरती
काळ्याशा लाटांची सागरभरती!
काळ्याच लाटांची सरण सोबत
काळोख्या मिठीचे काजळी स्वागत
खोल कुठेतरी, तरीही जागत
प्रकाशाचा कण राहिला सलत!

## वेदनेचा चारा

एकवेळ पंखावरून फिरलेला तुझा हात
पक्षी गहिवरलेला.........!
उधळलेला पापण्यांचा किनारा........
आणि पापण्यावर थरारलेल्या, तुझ्या चोचीच्या भावधारा
पक्षी बावरलेला
निळेनिळे आकाशच झाला!
इच्छा एवढीच त्याची नको हिरावूस वेदनेचा चारा

## वांझ शब्द

ओथंबून आलेले आभाळ
ज्यांच्या पापण्याना पेलवत नाहीं
त्यांची कूस वांझ असते.
ओथंबून आलेल्या घामाचा वास
ज्यांच्या गीताना पेलवत नाही
त्यांचे शब्दच वांझ असतात. !

## ख्रिस्त

जेव्हा पोटच पेटते–
आणि रक्ताची राख होते;
तेव्हा क्रूसावर ख्रिस्ताचा जन्म होतो.
माझ्या शब्दांनी वाहिलेत असले अनंत क्रूस
म्हणूनच ते ख्रिस्तच झालेत.

## एकदा

एकदा यायचंय........
खूप गायचंय.......
पिंजरा असेल तुझ्याकडे तर
कैदीच होऊन रहायचंय।

एकदा यायचंय
प्रकाश द्यायचाय्
तुझ्याच ओठांनी फुंकणार तर.......
मला मालवून घ्यायचंय!

## हाक

येताना बोलली नाही तुझ्याशी
पण आल्यावर एक निश्वास निखळला
एक आर्त-दर्दभरी अधिरी हाकच! —
विश्व व्यापत व्यापत तुझ्याकडे गेलेली
तुझा श्वास झालेली!

दाढीचे जंजाळ वाढविल्याने
क्षितीज सीमा सरत नाही
दाढीचे खुंट खुरटल्याने
मातीचे कवच निघत नाही
चंद्रावर पोहचलेल्यानीही
मातीशीच हातमिळवणी केली
आधरती सुधांशू
मातीचीच द्वाही फिरली
तू लाख निराकार असशील
मी साकारलो आहे.
जेव्हा मातीचा पुत्र होशील
तेव्हा मी तुझा आहे!

दाढीचे जंजाळ वाढविल्याने
क्षितीज सीमा सरत नाही
दाढीचे खुंट खुरटल्याने
मातीचे कवच निघत नाही
चंद्रावर पोहचलेल्यानींही
मातीशीच हातमिळवणी केली
आधरती सुधांशू
मातीचीच द्वाही फिरली
तू लाख निराकार असशील
मी साकारलो आहे.
जेव्हा मातीचा पुत्र होशील
तेव्हा मी तुझा आहे!

## मुलावण

ओठ : पोलादी मिठीचे,
अटीतटीचे, माझ्या आवडीचे.
डोळे : नाटकी नखऱ्याचे
फितुरी चाळ्याचे, माझ्या नावडीचे.
तू : गनीम देहाचा,
मालक मोहाचा, माझ्या जीवाचा.
डोळे फितुर झाले..........
अन् नाटकी मेले.... ! लाख बोलून गेले.
ओठ मधभारले
वेडे थरथरले अन् कैदी झाले.

## नाटक

आठवते....... .. ? त्या रात्री .........

चंद्र नव्हता, चांदण्या नव्हत्या

नदीचा किनारा नव्हता, मंद मंद वारा नव्हता

तू फक्त वाढत राहिलीस

मी अधाशी खातच राहिलो

म्हणालीस अखेर " हट्टी आहेस बघ

संपविलेस ना सारे !"

तेव्हाच आलो भानावर

आणि ओलावले डोळ्यांचे किनारे !

अनुक्र. २०१०८ दि: ५१०५
२१८९ २७११७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २०१०८
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

" वेडा कुठला ! " म्हणत म्हणत
ओठांनी उपवास सोडला तुझ्या ........
टिपत डोळ्यांचे किनारे.
आणि शिरलीस कुशीत
तृप्तीतृप्त होऊन, म्हणालीस
" तेवढा दिवा मालवतोस ना रे ! "
आता सारेच मालवलेले दिवे
रात्रीचे नाटक ठरलेले
पत्नीशी निष्ठा ठेवता ठेवता
मन तुलाच बिलगलेले !

## घर

रात्री बेरात्री चाहूल हुंगणाऱ्या गल्ल्या……
गटारालगत एक उंबरा : दोन गटारांतील सीमारेषा सांगणारा.
एक कुत्रा खरजुल्या कुत्रीला उगाच हुंगीत होता.
वीजेच्या दिव्याने डोळा मिचकावला….
पलीकडे सौदा पक्का ठरला !
तर अशी दारं उघडत असतात आणि बंद होत असतात
रात्रभर……..
कोणाच्या तरी नशिबाची आणि कमनशिबाचीसुद्धा !

याच वेळी धूप हुंगणाऱ्या देवळातील कीर्तन आटोपलेले
असते........

कृष्णगोपीचे आख्यान रंगलेले असते
सत्यवती काकूंच्या मिटल्या डोळ्यात:बुवांच्या डोक्यात
मोरपिस असते.

तर हे तसेही दिसते अन् असेही असते
" आयला ! कळायला लागल्यापासून आपण आईच्या
डोळ्यातील कुसळ झालो

पण जायचे तर कुठे बेवारशी होऊन ?
आणि बेवारशांनी तर कुठे जायचे आपले हे घर सोडून !

## भिंती

घरंदाजांच्या घरांच्या भिंती अपारदर्शक असतात
खूप पाहतात, साहतात, रंगांची लाच घेऊन मूक राहतात.
पण झोपडपट्टीच्या भिंती पट्टीच्या पारदर्शक असतात.
थोबाडात शेण कोंबले तरी आतील बित्तंबात सांगत राहतात
रात्रपाळीला विकून घेतलेल्या रंग्याच्या दारासमोर
एका मोटरचे दिवे अचूक वेळी लागतात आणि विझतात.
तेव्हा झोपडपट्टीतल्या तरण्या भिंती कुजबुजतात, खुदखुदतात.
जुन्या जाणत्या भिंतीमात्र हळहळतात, डोळे पुसून घेतात
कधी आतल्या आत कुढत राहातात, कुजत राहतात
सारेच असह्य झाले की स्वतःला जाळूनही घेतात
तेव्हा फूटपाथवरचा कोणीतरी उठतो, हळहळतो,

चार लक्तरांची भिंत बांधून सावलीत विसावतो
या फाटक्या भिंती प्रसूतिगृहातील नर्सेसच्या घडीदार
चेहऱ्याच्या नसतात
म्हणूनच रंग्याच्या घरातील नवगताचे स्वागत करताना
त्या हसतात, खुलतात
डोळ्यांचा पाळणा करून, त्या देवदूताला त्या जोजवितात
तेव्हा तिजोरीतील काही नोटा कमी झाल्याच्या घरंदाज
भिंतींना माहिती असतात.
आणि नाकर्त्या रंग्याच्या कर्तेपणाचा आव बघून
झोपडपट्टीतल्या भिंती सुखावतात !
' तुझे ठीक आहे, तू त्या निळ्या भिंतीच्या पल्याड राहतोस !
पण माझे एकदा ठरव; माझ्या समोरही निळी भिंत बांधतोस
की माझे डोळेच फोडतोस '!

## उमज

खेळता खेळता पाउलाना जाग आली
अपुऱ्या अंगणाची जाणीव मनाची सल झाली
अंगणाचा संघ सोडला डोळे बेफान होते
गालावर थरथरल्या खारकीकरांच्या ऋणांचे भान नव्हते
वडिलांचा एकुलता कोरडा हुंदका, मनात त्याला स्थान नव्हते.
मन क्षितिजाच्या पैल गेलेले, पाऊलांना गतीचे वेड होते या
या गतीनेच्च अगतिक केले, पाऊलांना परिस्थितीचे फोड आले.
जखमी होऊन तडफडलो, फडफडलो तसे कुंपणच माझ्याकडे
चालत आले

मनाला कान टाकता येते, देहाला नाही, हे कसे लख्ख
उमगले !
आता थरथरताहेत तिचे खारकी हात पोराच्या गालांवर
माझाही एक कोरडा हुंदका बोलका होतोय वेदनांच्या तालावर
" पोरा नको रे फरफटू या क्षितिजाच्या स्वप्नामागे
कोटीकोटी तीर्थांचे बळ आहे, तिच्या डोळ्यातील अश्रूंच्या
मागे
मेघावलीच्या तीर्थांना लाथाडणारा सागरही पोरकाच असतो
गतीचे वेड असूनही किनाऱ्याचा कैदीच असतो ! "
हे सारेच शब्दकसे मनातल्या मनात थिजून गेले
मन त्याची सावली होऊन त्याच्या बरोबर चालू लागले.

शंख–

म्हणाली होतीस, कर करात गुंफून
" चल मिटून जावू या सागर लाटांत मिळून "
कितीदा परतवले मी तुला समजूत घालून मरणाच्या
सीमेवरून
या ओठांनाच विचार कितीदा घेतला त्यांनी तुझ्या अश्रूंचा
पूर पिऊन
अखेर उखडलीस, तिरस्काराच्या नजरेची लाथ मारून
कडाडलीस
" असल्या शंखातील किटकासारखे जीवनाभिलाषेने
कळवळणारे तुम्हीं
विटाळलेली ही जीभच तोडावीशी वाटते, कधीतरी तुम्हांला

शंख–

म्हणाली होतीस, कर करात गुंफून
" चल मिटून जावू या सागर लाटांत मिळून "
कितीदा परतवले मी तुला समजूत घालून मरणाच्या
सीमेवरून
या ओठांनाच विचार कितीदा घेतला त्यांनी तुझ्या अश्रूंचा
पूर पिऊन
अखेर उखडलीस, तिरस्काराच्या नजरेची लाथ मारून
कडाडलीस
" असल्या शंखातील किटकासारखे जीवनाभिलाषेने
कळवळणारे तुम्ही
विटाळलेली ही जीभच तोडावीशी वाटते, कधीतरी तुम्हांला

म्हणालेली " स्वामी ? "
तेव्हा एक अल्वार सागरलाट तुझ्या चरणाशी थबकली,
मोती उधळून गेली फुटून
खुळ्यासारखा मी पहात राहिलो, त्या लाटेकडेच, डोळे
भरून, लाट होऊन
पावसाच्या धारेसारखी चिखलात पडलीस, तरी बहरलीस
पुन्हा अंकूर होऊन
फुललीस जुने विसरलीस, जुनेऱ्याची घडी मला भिकाऱ्याला
देऊन
मी विझवत आलोय एक एक दिप वाटेवरून अंधाराला
स्मरून
आता घ्यावे म्हणतो अखेरचेच मालवून पिळ पडल्या
आतड्याचा शंख तुझ्या हातावर ठेवून.

भरल्या पोटी उपासमारीवर बोलायला बरं वाटतं !
साखरभाताच्या ढेकरी बरोबर चारदोन उपमा सहज बाहेर
पडतात
स्टेशनवर गाडी थांबताच, भरल्या डब्यातून प्रवासी सहज
बाहेर यावेत तशा !
प्रतिमा डागळली तरी सहज पुसून घेता येते
नाहीतरी तुमच्या माझ्या प्रतिमेची किंमत ?
एक महिन्याच्या पगारा एवढी !
" जीवनाचा प्रवास........ जीवनाचा प्रवास....... "
असे घोकत असताना–
आपण जात असतो घरापासून ऑफीसपर्यंत.
शाश्वतमूल्यांच्या सावलीत विसावताना—

शेजारच्या विधवेच्या गॉगल किती आरामदायक वाटतो

आपणांला !

पुढच्या जन्मावर साला कोण विश्वास ठेवतो ?

कंडक्टरशी भांडतो आपण तीन पैशासाठी

हजारो मैलांचा प्रदेश चीनला दिला आपण.

( जाऊ दे, तो काय आपल्या बापाचा होता ! )

सहजासहजी, कोणीही, कोणाचाही,

बाप काढू शकतो

त्याची खात्री नसताना सुद्धा !

जनताजनार्दनाच्या राज्यात साऱ्यांना सारखेच स्वातंत्र्य !

माझी आई सड गोळा करते जळणाला

परवा कोणा पुढाऱ्याची चिता चंदनाची होती म्हणे !

## कल्पकतेने

*प्रतिपदा—*

मी भीतीने भोवंडून गेले
मिटल्या डोळ्यांचे देठ तोडून
थेंब तटतटून बाहेर आले
बाई ग ! त्यातही तो तक्षक होता
त्यानेच मला छळले, त्यानेच मला गिळले
कसे सांगू ?
मी मिटून गेले, .... सुखावले,.... सोकावले !

*द्वितीया—*

तेव्हा मी केतकींचे वन.
त्याचे डोळे भुकेजला कातळ.
धुसफुसत, मुसमुसत तो आला...
पानापानांत खिळखिळी करून गेला.
नकोनकोसे वाटले तरी........
माझा सुगंध त्याचाच पाठलाग करीत राहिला !

*पौर्णिमा—*

मी उतावळी सागरलाट
तो पौर्णिमेचा सौम्य शीतल चंद्र.
मी बहुरुपिणी, रोमारोमांचे डोळे करून
त्याला जाळ्यात ओढून घेतले,
हृद्यात साठविले.
तेव्हा दूर रजनीच्या कुशीत चांदण्याचे एक बाळ पाहिले
मी शहारले, थरथरले, पौर्णिमाच झाले
धरणीमाता पोटात घेईल तर बरे ! .......वाटले......
त्याच्यात कुशीत लपून.......लपेटून राहिले... !

## संजीवन

जागृतीचा शाप दिला तुझ्या पदरवाने
स्वप्न सखे झाले जखमी तुझ्या चाहुलीने
स्वप्न सये सरले आणि तूही इथे नाही
लोचनात जळती ज्योती शून्य दिशा दाही
एकदाच, एकदाच, नयनांतरी येई
पापण्यास स्पर्शाचे संजीवन देई
अखेरचीच मिटीन सखे लोचने सुखाने
पुन्हा असे जाणे नाही, आणि स्वप्न पहाणे.

## परदुःख शीतल

कोणालाच कळले नाही
एका सकाळी तूर हळद लावून हसली
फुलणारा जोंधळा काळा ठिक्कर पडला
हसणारे ओठ दाबून चिडीचिप्प बसला
अर्ध्या हळकुंडाने पिवळा झालेला भुईमूग
उगीच जरासा हसला.......
पांढरे पाय जमिनीत खुपसून
ऐसपैस बसला!

## 'ॐ' कार

बाळ मज 'आई' आज म्हणाला
घरी या स्वर्गच ग अवतरला
जशा फुलाव्या पुष्प पाकळ्या
तशा उमलल्या ओठ पाकळ्या
'आई' शब्द हा जधी उमटला
मनाचा फुलला मोर पिसारा

शब्द हळू वाऱ्यातून आला
दाही दिशातून सुगंध भरला
मला वेडीला पहिला वहिला
'ॐ' कारच वाटला!

गतजन्मींची नयनी ओळख
फुलवीत राहतो गुलाम खिदळत
'आई' म्हणोनी या जन्मीचा
पांग आज फेडीला.

## प्रतिक्षा

मी पहाटलो होतो तुझ्याचसाठी, प्रकाशलो होतो तुझ्याचसाठी
अन् विसरलो होतो जग हे असते स्वतःसाठी, अन् स्वतःचसाठी
जग– दिवे मालवून प्रकाशाचे स्वागत करणारे!
जग– दिवे लावून अंधाराचे स्वागत करणारे!
मी पहाटलो होतो तुझ्याचसाठी, प्रकाशलो होतो तुझ्याचसाठी
बरे केलेस, तुझ्या नकाराचे निरांजन लावलेस माझ्यासाठी
जळलो, काजळलो, तरी स्मशानातही तेवतच राहिलो
ठिणग्यांच्या फुलांनी हसत राहिलो, तुझीच वाट पहात राहिलो!

## वेदना

तुझ्याशिवाय जगताच येणार नाही असे नाही,
अठ्ठावीस वर्षांत भेटलेल्या वाटांना विचार
एक एकाकी प्रवासी, त्यांच्या उरात रुतलेला, सदा बहरलेला
लोभाच्या जांभूळ वनातून वाट काढीत काढीत मी तुझ्यापर्यंत
पोहोचलोय.
खरे तर तुझ्याच कृपेने जमाखर्ची आयुष्य सोडून उतू गेलोय.
पण निघताना नकाराचे नष्टचर्य दिलेस .
ज्याला फुलेच हवी होती, त्याला नकाराचे काटे दिलेस
पण तुझ्या शिवाय जगताच येणार नाही असे नाही
कारण वेदना माझ्या उरात असतात व त्यातच असतेस तूही !

## हवाबंद

हवाबंद घरात राहणारे लोक
हवाबंद गाडीतून थिएटरकडे जातात
आणि हवाबंद थिएटरमधील
हवाबंद नाटके पाहतात.
मी असे ऐकले आहे की,
असे हवाबंद लोक
हवा-बंद होऊनच
मरण पावतात!

## बिंग

नदी किनारा, रिता पोहरा, रित्या रित्या साऱ्या वाटा
या पाण्याला ठाऊक नाही, तरीही गावभर बोभाटा
छे! छे! मी ग कशास बोलू? शपथ तुझी माझ्या ओठा
गुपित लपविले, तरीही फुटले दामच ग आपुला खोटा
हां! आठवले, न कळत घडले, आपुले फुटले बिंग सये
भरबाजारी तुझी हुषारी वाया गेली कशी बये?
मला पाहता जरा थबकलीस, वळुनी पाहिले पुन्हा पुन्हा
त्या नजरेने पिटली दवंडी आणि जाहला सिद्ध गुन्हा!

## मन

वचना फिरवीत, नकार मिरवीत, आलीस करण्या नष्ट मला
या नयनांतील जळल्या तारा, तरीही आले हसू तुला
जिणे जागले अंधारातच, अंधारातच अन् विरले
उरले होते वच ओठींचे, ओठामध्ये विरघळले
कापूर झाला या देहाचा, नुपूर तरी मनी रुणझुणले
धुके होऊनी, सजल लोचनी मन तुज भवती घुटमळले
स्मरून वचना, फिरून येशील, ये तेव्हा अल्वार जरा
दवबिंदूचे सजवुनी डोळे रिचवून घेईन तव नरवरा.

## जार–

आम्ही जगलो, जगणेच भाग होते
आम्हांला जगविणारे, लाख लाख जार होते
जार हवे तेव्हा येत, जार हवे तसे येत
आम्हांला हवे तसे भोगत, हवे तसे पैसे देत
तसे आम्ही एकनिष्ठ होतो, जारनिष्ठ होतो
प्रत्येक वेळी प्रत्येक जाराशी 'भाव' निष्ठ होतो
बाप आमचे जार होते, भाऊ आमचे जार होते
आते, काके, मामे, सोमेगोमे आमचेच जार होते
जार होते म्हणून आमचे बाजार होते
आम्ही मेलो ! ...... मरणेच भाग होते
आम्हांला मारण्यासाठी लाखांचे होकार होते

## फाया–

उष:काल तव नयनी नटला, गालावर हसली लाली
किती आवरली तऱ्ही आम्हांला शिंक एक आली साली !
खुलल्या मिटल्या नयन पाकळ्या गालावर फुलली आग
विभ्रमात त्या भ्रमलो आम्ही मन मयुरा आली जाग
दर्दी आम्ही, विभ्रमातली तुझी जाणली मनवर्दी
वय सोळाच्या मदन फुलांची तुझ्या तनुवर ही गर्दी
नयनामधले उषानाट्य तव नांदीतच गेले वाया
तुझ्या रुपाचा करून वाटले घालावा कानी फाया.

खपली–

अेक फुलपाखरू अलगद अलगद.......
काकडीच्या फुलावर उतरले
डोळे फाडून बघता बघता
गव्हाचे डोळेच फाटले
दिवस कसे भरभर गेले.......
वेलीच्या अंगावर पोर खिदळले
जोंधळा खाकरून गव्हाला म्हणाला
" कसे काय तब्येत बरी आहे ना आपली ! "
कसनुशा चेहऱ्याने गहू उत्तरला
" बरं हाय आता...... पडलीय खपली ! "

## निर्मिती—

सातखडे भिजले
डोळे माझे थिजले
डोळ्यात राख : टाकोटाक
जीवाच्या आकांताने मारली हाक
हाक गेली रानात... ....
दूर दूर वनात........
हाकेने हरवले आभाळाचे भान,
थरथर कापले सूर्याचे पान
पान कापले थरथर.... ....
डोळे झरले झरझर.......
झरझर डोळ्यांच्या सरसर वाटा
शब्दांनी केला सारा बोभाटा !

**खपली–**

अेक फुलपाखरू अलगद अलगद.......
काकडीच्या फुलावर उतरले
डोळे फाडून बघता बघता
गऱ्हाचे डोळेच फाटले
दिवस कसे भरभर गेले.......
वेलीच्या अंगावर पोर खिदळले
जोंधळा खाकरून गऱ्हाला म्हणाला
" कसे काय तब्बेत बरी आहे ना आपली ! "
कसनुशा चेहऱ्याने गहू उत्तरला
" बरं हाय आता...... पडलीय खपली ! "

## निर्मिती—

सातखडे भिजले
डोळे माझे थिजले
डोळ्यात राख : टाकोटाक
जीवाच्या आकांताने मारली हाक
हाक गेली रानात... ....
दूर दूर वनात........
हाकेने हरवले आभाळाचे भान,
थरथर कापले सूर्याचे पान
पान कापले थरथर.... ....
डोळे झरले झरझर.......
झरझर डोळ्यांच्या सरसर वाटा
शब्दांनी केला सारा बोभाटा !

## शिका–

पहिल्यांदा बोलायला शिका.. ....
मग चालायला .....
मग पहायला........वाचायला........लिहायला
वाहनात बसायला........वाहने चालवायला........
पदवी घ्यायला......पदवी द्यायला........
मग शिका प्रेम करायला (अगोदरही चालेल )
मग बाप व्हायला... .. (आईसुद्धा......)
मग म्हणा, " ब्यायला ....... साला लगेच लगेच गेला !"
तर शिका. .शिका.... आणि शिका....आणखी शिका....
मरणाला बिनमोल विका.... ...

## अद्वैत–

असे तुला भलेसलते मिळायचे नाही
म्हणत म्हणत मिटले मी तुझ्या नयन डोही
नेत्र तुझे बावरलेले तसे मागताना
शब्द शब्द वादळलेला आणि बोलताना
मीही पण थराथरले जपून दूर जाई...
जपून दूर सरताना हरवलेच बाई.
झपाटला वादळवेडा स्पर्श तुझा झाला
जपताना जपताना तोल असा गेला
अणुरेणू अणुरेणू वेणू जणू होई
दूर दूर प्राणातही मीही तूच होई.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २०१०८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम २०१०८ दि: [illegible]
२९८९ [illegible]

REFBK-0020108
REFBK-0020108

गस्त--

माझा मोह मोहरलेला मस्त
तू गंधवती तटस्थ
आता मात्र माझा अखेरचा अगदी अखेरचाच अस्त
ज्याची तुझ्या भोवती जन्मोजन्मी गुंजेल गस्त.

पोटात गलबलून आल्याने जन्मलेली ही कविता. जीवनानुभवांवर पोसलेली. जीवनानुभव लाख तऱ्हांचे. " आणि बेवारशांनी तरी कुठे जायचे, आपले हे घर सोडून ?" असे म्हणणाऱ्या वेश्येच्या मुलांपासून पुढाऱ्याच्या चंदनी चितेपर्यंतचे. प्रीती तर आहेच. बहुरूपिणी. ' भित्र्या राणी'चे मन, 'साळसूद' करडईचा प्रणय, प्रेयसीच्या आठवणींच्या ' चक्रा 'त सापडलेला तो, तर कधी ' एकदा' सारख्या कवितेत व्यक्त झालेले वेगळे समर्पण. समर्पण शब्दांचेही असते. सौंदर्याचा शोध घेत घेत अभिव्यक्त होणारे शब्द कधी कधी ख्रिस्तच होतात. या ख्रिस्तांचे क्रूस वाहणेही सौंदर्य-पूर्ण असते. प्रतिभेचे अनाकलनीय विश्व इथे प्रकाशपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला. शब्द साऱ्यांचाच बोभाटा करतात, पण ह्या बोभाट्यातही एक लय असते. ' शिका ' सारख्या कवितेतील लय यंत्रवत् जीवनाचे दाहक दर्शन घडविते, तर ' फाया ' सारखी कविता गंधगूज करीत राहाते. अर्थातच वाचकांचे डोळे पुन्हा पुन्हा ह्या कवितेकडे वळले तरच ही ' गस्त ' यशस्वी. अन्यथा अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली ही कविता पांढऱ्यावरचे काळे ठरेल.